# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. २९ ऑक्टोबर २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६३२/२०२२ भादंविसक २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४,१३४(अ),(ब) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी १९.३० वा चे सुमारास, पोलीस प्रशिक्षण केंद्र, केगाव समोरील सर्व्हिस रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २९/१०/२०२२ रोजी १३.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अमोल मारुती इगवे, वय- ३० वर्षे, रा. मु.पो. केगाव, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा- सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मोटार सायकल क्रं. एम एच १३ बी डब्ल्यु ३६४६ चा चालक विदयानंद रावसाहेब जाधव |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे हिरज शिवारात, माळरानावर म्हशी चारुन परत घराकडे जात असताना, वरील ठिकाणी पायी चालत असताना फिर्यादीचे पाठीमागुन येणाऱ्या मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, निष्काळजीपणाने, भरधाव वेगात, रस्त्याचे भान न राखता चालवुन फिर्यादीस पाठीमागुन धडक देवून, त्यात फिर्यादीचे डोकीस, उजवे हातास व उजवे पाय फ्रॅक्चर करुन गंभीर दुखापत होणेस कारणीभुत ठरला आहे व फिर्यादीस उपचारास हॉस्पीटलमध्ये दाखल न करता तेथुन पळुन गेला आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीताविरुध्द तक्रार आहे. तपास:- पोना/ १३८५ कसबे - |

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९२/२०२२ भादंविसक २७९,३०४ (अ) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २९/१०/२०२२ रोजी सकाळी १०.४५ वा चे सुमारास, रायबाण क्लिनीकच्या समोर, मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २९/१०/२०२२ रोजी १७.१८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उस्मान युन्नुस चौधरी, वय- ३० वर्षे, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | ढंपर क्रं. एम एच १३ ए एफ ६५५१ चा चालक |
| **मयताचे नाव** | : | आजान उस्मान चौधरी, वय- दिड वर्षे, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची सासु, सासरे व फिर्यादीचा मुलगा आजान हे सासऱ्यांची तब्येत बरी नसल्याने रायबाण क्लिनीककडे जात असताना, रायबाण क्लिनीकच्या समोर, मड्डी वस्ती, भवानी पेठ येथे वरील आरोपीत वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, बेदरकारपणे व वगाने चालवुन फिर्यादीचा मुलगा आजान याला धडक देवून, त्याच्या मृत्युस कारणीभुत झाला आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीत वाहन चालकाविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. तपास:- सपोनि/ पवार - **९८८१९०२६२४** |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९७/२०२२ भादंविसक ३२७,३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/१०/२०२२ रोजी २३.०० वा चे सुमारास, मौलाना आझाद चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २९/१०/२०२२ रोजी १७.४४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अल्ताफ हमीद शेख, वय- ४५ वर्षे, रा. घर नं. ९६, शिवगंगा नगर भाग-१, नई जिंदगी, |

| | | |
|---|---|---|
| | | सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | नय्युम शेख, वय अंदाजे - ३० वर्षे, २) नदिम शेख, वय अंदाजे २५ वर्षे, दोघे रा. ज्योती जनरल स्टोअर्सचे बोळात, नई जिंदगी, सोलापूर, ३) इतर दोघेजण पुर्ण नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा भाऊ यांचा फोन आला त्यावेळी फिर्यादी हे पायी चालत मौलाना आझाद चौकातुन सितारा चौकाकडे फोनवर बोलत चालले असताना, वरील ठिकाणी फिर्यादीच्या ओळखीचे आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस पाहुन मुद्दाम खिजवण्याचे उद्देशाने हसला म्हणून त्यास फिर्यादीने माझेकडे पाहुन का हसला असे विचालेचे कारणावरुन चिडुन जावुन शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर वरील आरोपीत क्रं. २ व इतर दोघांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच वरील आरोपीतांनी फिर्यादीस लाकडाने पाठीवर, छातीवर, उजवे हाताच्या कोपऱ्यावर, डावे पायाच्या मांडीवर, तोंडावर व कोणत्यातरी लोखंडी वस्तुने डोक्यात जोरात मारुन गंभीर जखमी केले आहे व फिर्यादीच्या शर्टाच्या खिशातील असलेले रोख रक्कम दहा हजार रुपये काढुन घेतले आहेत म्हणून. तपास:- पोसई/ वळसंगे - **९८२२८०७२१५** |